**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक:31.08.2026** **वार:सोमवार**

---

1. नशामुक्त युवा मोहीम हा देशातल्या युवा पिढीच्या उज्ज्वल भविष्याचा एकत्रित निर्धार असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. भावी पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरणाचा वारसा सोपवणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचं राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचं प्रतिपादन
3. गणेशोत्सवाच्या काळात प्लाझ्मा साउंड आणि प्रखर लेझर प्रकाश झोतांच्या वापरावर पुणे ग्रामीण पोलिसांची बंदी आणि
4. महिलांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत थायलंडचा पराभव करत भारताची विजयी सलामी

**<u>मन की बात</u>**

विकसित भारतासाठी नशामुक्त युवा ही मोहीम म्हणजे देशातल्या युवा पिढीच्या आरोग्य, आनंद आणि उज्ज्वल भविष्याचा एकत्रित निर्धार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमात बोलत होते. जास्तीत जास्त संख्येनं युवक युवती यामध्ये सहभागी होत आहेत याचं आपल्याला समाधान आहे असं मोदी म्हणाले.

पीएम स्वनिधी योजनेचा लाभ घेऊन लाखो महिला आपला व्यवसाय वाढवत आहेत असं पंतप्रधान म्हणाले. देशातल्या मुलींची स्वप्नं आता उंच अवकाशात भरारी घेत आहेत. भारतानं मिशन शक्तीसॅट अंतर्गत देशातल्याच नव्हे तर जगातल्या हजारो मुलींच्या अशा स्वप्नांना बळ देण्याचं कार्य सुरू केलं असल्याचं सांगताना मोदी म्हणाले.....

**आज हमारी बेटियों के सपनों की उड़ान, धरती से निकलकर अंतरिक्ष तक पहुंच रही है और आपको यह जानकर गर्व होगा कि भारत, ऐसे सपने देखने वाली दुनिया की हजारों बेटियों को एक साथ जोड़ रहा है। इस प्रयास का नाम है मिशन शक्ति सेट। इसके माध्यम से 108 देशों की 12 हजार छात्राओं को सेटलाइट टेक्नोलॉजी सीखने और इंनोवेशन के क्षेत्र में आगे बढ़ने का अवसर मिल रहा है।**

मुंबईच्या कृष्णा शेषाद्री यांनी तयार केलेल्या भारतराज्य या संकेतस्थळाची पंतप्रधानांनी प्रशंसा केली. इतिहासातल्या एखाद्या वर्षात भारतातल्या कुठल्या प्रांतात कुठल्या राजाची राजवट होती हे शोधणं या संकेतस्थळाच्या मदतीनं शक्य झालं आहे अशी माहिती त्यांनी दिली. पंतप्रधानांनी या कामाची मन की बात मध्ये दखल घेतल्याबद्दल कृष्णा शेषाद्री यांनी आनंद व्यक्त केला......

**मैंने ये वेबसाइट बनाना शुरू किया था। वो एक छोटा सा हॉबी जैसा प्रोजेक्ट की तरह ऐसी शुरू किया था। प्रधानमंत्री जी ने मुझे सिर्फ सवाल नहीं पूछे थे। उन्होंने मेरा वेबसाइट देखा और उसे एक्सपीरियंस किया। उसके अलग अलग फीचर देखे उसको पूरी तरह ऐसी समझा। उसकी पूरी तरह ऐसी परखा उसके बारे में मेरे को पूछा। मेरा वेबसाइट अच्छा लगा। उससे ज्यादा वैलिडेशन मेरे को और कुछ नहीं हो सकता।**

आगामी सणासुदीच्या काळात नागरिकांनी स्थानिक उत्पादनांच्या खरेदीला प्राधान्य द्यावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>राज्यपाल</u>**

देशाच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाभ्यासाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणं आवश्यक आहे असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. स्वामी कुवलयानंद यांच्या 143 व्या जयंतीनिमित्त लोणावळ्यातल्या कैवल्यधाम योग संस्थेत काल झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि विकसित भारताच्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असं राज्यपालांनी नमूद केलं.

**<u>राज्यपाल-पुरस्कार</u>**

निसर्गाचं संवर्धन करणं हे प्रत्येक नागरिकाचं मूलभूत कर्तव्य असून, येणाऱ्या पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरणाचा वारसा सोपवणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं. भामला फाउंडेशन आणि पंचशील रिॲलिटी यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल पुण्यात बोलत होते. यावेळी ग्रीन क्रुसेडर्स आणि अचिव्हर्स पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. फाउंडेशनच्या नाला सुशोभीकरण मोहीमेचं राज्यपालांनी कौतुक केलं. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>मराठा आरक्षण</u>**

राज्य सरकारने मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून घोषित करावं, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी काल आंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलताना केली. ही मागणी पूर्ण झाली नाही, तर मुंबईपर्यंत मोर्चा काढण्याचा आणि आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, मराठा समाजाच्या प्रश्नांवर याआधीही मार्ग काढला होता, यातूनही मार्ग काढू, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात वार्ताहरांशी बोलताना केलं.

**<u>साखर कारखाने</u>**

राज्यातला ऊसाचा 2026-27 या वर्षाचा गाळप हंगाम सुरु होत आहे; या पार्श्वभूमीवर वजनकाट्यांची तपासणी करण्याबाबत राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी सर्व

जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले आहे. उसाच्या वजनकाट्यांची तपासणीसाठी आपापल्या जिल्ह्यात भरारी पथकांची स्थापना करावी, अशी सूचना साखर आयुक्तांनी केली आहे.

**नांदी संमेलन बैठक-सांगली**

पुण्यात होणारं शंभरावं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि 99 नांदी साहित्य संमेलनांच्या निमित्तानं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सांगली शाखेनं काल 'साहित्य प्रेमींचा स्नेह मेळावा' आयोजित केला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी यामधे मार्गदर्शन केलं. डिसेंबर महिन्यात सांगलीत होणाऱ्या नांदी संमेलनाविषयी बोलताना ते म्हणाले…

**आम्ही जे वेगळेवेगळे विषय दिलेले होते, त्यानुसार सत्तावीस डिसेंबरला सांगलीमध्ये सांगली शाखा जे संमेलन घेणार आहे, त्याच्यामध्ये त्यांचा विषय युवा संमेलन असा आहे. तर त्यांना सांगताना किंवा माझ्या ज्या काही महत्वाच्या सूचना आहेत, की याच्यामध्ये ऐंशी टक्के युवकांचा म्हणजे श्रोत्यांपासून ते व्यासपीठामध्ये स्वतःचे विचार मांडण्यासाठी स्वतःचं साहित्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी, मग कविता असतील, अभिवाचन असेल, वेगवेगळ्या त्यांच्या लिखाणाचं, ललित लेखनाबद्दल असेल इतकंच नाही तर ट्विटर आणि फेसबुक वरती सुद्धा जे लेख लिहिले जातात त्याच्याबद्दल सुद्धा त्याची सुद्धा दखल या तरुणाईची घेतली पाहिजे. अशा पद्धतीचीच रचना आणि आयोजन हे युवा साहित्य संमेलनात व्हावं अशी माझी मनापासून इच्छा आहे.**

**श्रावणी सोमवार-नाशिक**

तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक नाशिकमध्ये दाखल झाले आहेत. काल रात्री ब्रह्मगिरीच्या महाप्रदक्षिणेला प्रारंभ झाला.

**सिद्धेश्वर पदयात्रा-सोलापूर**

तिसऱ्या श्रावणी रविवारचं औचित्य साधून सोलापुरात ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांनी पंचक्रोशीत स्थापन केलेल्या 68 मंदिरांमध्ये पदयात्रा काढण्यात आली. श्री मल्लिकार्जुन मंदिरातल्या आरती आणि पूजनानं याचा समारोप झाला.

**प्लाझ्मा साउंड लेझर बंदी**

आगामी गणेशोत्सवाच्या काळात ध्वनीक्षेपक व्यवस्थेतील प्लाझ्मा साउंड आणि प्रखर लेझर प्रकाश झोतांच्या वापरावर पुणे ग्रामीण पोलिसांनी बंदी घातली आहे. ध्वनीपातळीच्या मर्यादेचं उल्लंघन करणाऱ्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिला आहे. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी जिल्ह्यातल्या प्रमुख दीडशे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पुणे ग्रामीण पोलिसांनी आयोजित केली होती. या बैठकीत गणेशोत्सव शांततेत आणि नियमांचं पालन करून साजरा करण्याबाबत पोलिसांनी मंडळांना मार्गदर्शन केलं. दरम्यान गणेशोत्सवाच्या काळात होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या विरोधात काल पुण्यात अनेक नागरिकांनी एकत्र येत

मोर्चा काढला. उत्सव काळात डीजेच्या कर्णकर्कश आवाजावर बंदी घालावी अशी मागणी या नागरिकांनी केली.

**गुंतवणूक-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्हा गुंतवणूक परिषदेत काल 2 हजार 159 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. पंचतारांकित हॉटेल, जहाजबांधणी, सौर, मत्स्य व्यवसाय, रसायन अशा विविध क्षेत्रातल्या उद्योगांमध्ये यावेळी गुंतवणूक करण्यात आली. या गुंतवणूकीतून जिल्ह्याच्या औद्योगिक आणि पर्यटन विकासाला नवी गती मिळेल असं जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यावेळी म्हणाले.

**शरद पवार सत्कार-धुळे**

धुळे इथल्या इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळातर्फे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांच्या कृतज्ञता सोहळ्याचं काल आयोजन करण्यात आलं होतं. विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दूरस्थ माध्यमातून या कार्यक्रमाला संबोधित करत इतिहास संशोधन संस्थांचं महत्त्व अधोरेखित केलं.

**नेपाळ**

नेपाळमधील महापूरात आतापर्यंत 794 नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत. तर तिबेटमध्ये मृतांची संख्या 16 झाली असून 546 लोक बेपत्ता आहेत. नेपाळमधील बाधित आठही जिल्ह्यांत पूरस्थितीमध्ये अडकलेल्यांची सुटका करण्यासाठी बचाव पथकं शर्थीचे प्रयत्न करत आहेत. दरम्यान पूरस्थितीमुळे नेपाळ, चीन अथवा तिबेटमध्ये अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र काम करत आहे. 1070 या दूरध्वनी क्रमांकावर याबाबतची माहिती मिळू शकेल. पुरामुळे चीनमध्ये अडकलेले राज्यातले 69 नागरिक आज मुंबईत पोहोचतील.

**महिला-क्रिकेट**

दुबईत सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषकाच्या वीस षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत भारताने थायलंडचा 94 धावांनी पराभव करत विजयी सलामी दिली. भारताने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 9 बाद 159 धावा केल्या. शफाली वर्मानं 64 धावा केल्या. भारतीय महिला गोलंदाजांनी केलेल्या भेदक कामगिरीमुळे थायलंडचा डाव सतराव्या षटकांत 65 धावांत आटोपला. शफाली वर्मा हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. भारताचा पुढचा  सामना येत्या 3 सप्टेंबर रोजी हॉंगकॉंग विरुद्ध होणार आहे.

**हवामान**

राज्यात आज कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**